# शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे.

विद्यानगरी, देवपुर , धुळे - ४२४ ००५.
फोन :- ०२५६२-२७२१०३ फॅक्स :- ०२५६२-२७२१०३ .

शांतनिधु/के.भांडार/जा.लिलाव( २०१५-१६&२०१७-१८)/२०१९-२०/ 2284

दिनांक :- 17 SEP 2019

जाहीर लिलाव

शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे संस्थेच्या विभागातील निर्लेखित करण्यात आलेल्या उपकरणांची व जुने भंगार जॉब खालील अटीवर एकत्रित रित्या जाहीर लिलाव पद्धतीने विक्री करावयाची आहे. त्याकरीता ईच्छुक खरेदीदारांनी जाहीर लिलाव प्रक्रीयेत सहभाग घ्यावा ही विनंती .

***अटी व शर्ती यांचा तपशिल खालील प्रमाणे***

***१)जाहीर लिलावाचा दिवस सोमवार दिनांक:- ३०.०९.२०१९ रोजी दुपारी १२:३० वाजता.***

२)निर्लेखित उपकरणांची व जुने भंगार जॉबची पहाणी दि:-१७.०९.२०१९ ते दि:-२७.०९.२०१९ सुटीचा दिवस वगळून कार्यालतीन वेळेत सकाळी १०:३० ते ०५ वाजे पर्यंत राहील.यासंबंधी जास्तीची माहीती आवश्यक असल्यास या संस्थेचे भांडार अधिकारी / भांडारपाल यांच्याशी संपर्क साधावा.

३.) सर्व ईच्छुक खरेदीदारांनी सोबत आधार कार्ड व पॅन कार्डचे साक्षांकीत छायांकित प्रत दोन प्रतीत सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा लिलावात भाग घेता येणार नाही.

४)अमानत रवकम रु.३०००/-( तीन हजार मात्र ). )अमानत रवकम भरायची वेळ सकाळी १०पासुन ते १२:००पर्यंत तदनंतर येणारे व्यक्तीचे अनामत रक्कम स्विकारली जाणार नाही.

५)अमानत रवकम भरलेल्या व्यक्तीलाच लिलावात बोली बोलता येईल. दुपारी १२:३० वाजेनंतर येणारे व्यक्तींना बोलीत भाग घेण्यास परवानगी राहणार नाही.

६)सर्वाधिक बोली बोलणाऱ्या व्यक्तीचे नांव मंजुर करण्यात येईल. इच्छुक खरेदीदारांने लिलाव झालेली संपुर्ण उपकरणे व जुने भंगार जॉब आहे त्या ठिकाणी व आहे त्या स्थितीत खरेदी करणे आवश्यक राहील. संस्थेतर्फे ठरविण्यात आलेल्या किमान बाजारभावाप्रमाणे एवढे अथवा त्यापेक्षा जास्त दराने खरेदी करणा-यास उपकरणांची विक्री करण्यात येईल.

७)लिलावात ज्यांचे नाव मंजुर झालेले आहे त्या व्यक्तीने सर्व पैसे लिलावाचे दिवशीच सायंकाळी ५.०० वाजेच्या आत कार्यालयात विक्रीची एकुण रक्कम रोख / ' प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे नावे चेक / RTGS द्वारे भरावे लागतील. चेक / RTGS द्वारे पेमेंट केल्यास, सदर विक्रीची एकुण रक्कम ' प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे खात्यावर जमा झाल्या शिवाय कोणतेही निर्लेखित उपकरणे व जुने भंगार जॉब जागेवरुन संस्थेबाहेर नेता येणार नाही.

८)लिलावाची मंजुर झाल्यापासून / ' प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन,धुळे' यांचे खात्यावर जमा झाल्यापासुन २४ तासाच्या आत निर्लेखित साहित्यांचा लोडींग अनलोडींग तसेच वाहतुकीचा संपुर्ण खर्च खरेदीदारांकडे राहील,दरम्यान त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही.

९.)निर्लेखित उपकरणे व जुने भंगार जॉब लोडींग अनलोडींग दरम्यान तसेच वाहतुकी दरम्यान कोणतीही अनुचित घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही.

१०)विक्री मंजुर झाल्यावर निर्लेखित साहित्याची व जुने भंगार जॉबची रवकम विहीत मुदतीत न भरल्यास अनामत रवकम जप्त होवून शासनाकडे जमा करण्यात येईल व तदनंतर काहीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

११.) ***लिलाव मंजुर करणे/नामंजुर करणे/तहकूब करणे/रद्द करणे इ.बाबतचे संपुर्ण अधिकार खाली स्वाक्षरी करणारांकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.***

(डॉ.आर.जी.वाडेकर)
प्राचार्य,
शिक्षण महर्षी दादासाहेब रावल
शासकिय तंत्रनिकेतन,धुळे.

प्रत सविनय सादर :-

१.)मा.संचालक सो,तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य , ३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्रमांक १९६७,मुंबई -४०० ००१- यांना माहितीस्तव व स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर.

२.)मा.सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय , शासकी य तंत्रनिकेतन परिसर सामनगांवरोड, नाशिक रोड,नाशिक - ४२२ १०१ -यांना माहितीस्तव व स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर.

३.)विभाग प्रमुख,संगणक, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना =संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव.

४.)विभाग प्रमुख,उपयोजित यंत्रशास्त्र विभाग, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना =संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव.

५.)विभाग प्रमुख,स्थापत्य, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे.- यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

६.)कर्मशाळा अधिक्षक, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे. -यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

७.)कार्यालय विभाग, शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन,धुळे यांना माहीती व मुख्य सुचना फलकावर प्रदर्शिक करणेस्तव.